प्रेसनोट दि. २३/०७/२०१९

**“गोसावी वस्तीत चोरुन गांजाची विक्री करताना महिला जेरबंद ”**

अंमली पदार्थ विरोधी पथकातील, सहायक पोलीस निरीक्षक रायकर, सहा. पो फौजदार शिंदे, पोलीस हवालदार शिवाजी राहिगुडे, प्रफुल्ल साबळे, महिला पोलीस हवालदार मिना पिंजण, महिला पोलीस नाईक हेमा टेबे, पोलीस नाईक मनोज साळुंके, चालक योगेश मोहिते असे स्टाफसह दिनांक २२/०७/२०१९ रोजी हडपसर, गोसावी वस्तीत पायी पेट्रोलिंग करीत असताना, महिला नामे राणी पिराजी सुर्यवंशी, वय – ३८ वर्षे, रा. सर्व्हे नंबर १०६, गोसावी वस्ती, हडपसर, पुणे हीचे जवळ २२,७४०/- रु चा ०१ किलो १३७ ग्रॅम गांजा व गांजा विक्रीतुन मिळालेले रोख ७००/-रुपये असा एकुण २३४४०/- चा ऐवज जवळ बाळगल्याने तिचे विरुध्द हडपसर रोड पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल करुन तिस सदर गुन्हयात अटक करण्यात आलेली आहे.

सदरची कारवाई, अंमली पदार्थ विरोधी पथकाचे प्रमुख पोलीस निरीक्षक विजय टिकोळे, यांचे मार्गदर्शनाखाली सहायक पोलीस निरीक्षक बापु रायकर, सहायक पोलीस उप निरीक्षक अविनाश शिंदे, पोलीस हवालदार शिवाजी राहिगुडे, प्रफुल्ल साबळे, मिना पिंजण, पोलीस नाईक मनोज साळुंखे, हेमा ढेबे, चालक योगेश मोहिते यांनी सहभाग घेतला.

दाखल गुन्हयाचा पुढील तपास हडपसर पोलीस ठाणे पुणेशहर हे करीत आहेत.